03 AUG 2021
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कष्टकऱ्याला कथानायक म्हणून उभे करणे हे अण्णा भाऊंचे योगदान

## लहू कानडे : शिवाजी विद्यापीठातर्फे विशेष व्याख्यान

कोल्हापूर, ता. २ : "अण्णा भाऊ साठे यांनी कष्टकऱ्याला मराठी साहित्याच्या प्रांतात कथानायक म्हणून त्याचे अस्तित्व प्रदान करण्याचे महत्कार्य केले," अशा शब्दांत विधानसभेचे सदस्य लहू कानडे यांनी गौरव केला. शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णा भाऊ साठे अध्यासनातर्फे अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाईन व्याख्यान झाले. 'शिव-वार्ता' यू-ट्यूब वाहिनीवरून प्रसारण झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर उपस्थित होते.

श्री. कानडे म्हणाले, अण्णा भाऊंनी व्यक्तीप्रधानतेऐवजी घटनाप्रधान लेखनाला प्राधान्य दिले. खरे तर अण्णाभाऊ हे शेक्सपिअरच्या तोडीचे साहित्यिक; पण इथल्या जातव्यवस्थेमुळे त्यांच्यावर अन्याय झाला. तरीही अण्णाभाऊंनी न डगमगता लेखणी चालविली.



लहू कानडे

वंचित, शोषित, कष्टकरी लोकांना कथा-कादंबऱ्यांचे नायक केले. हे लोक कधी जिंकतात, कधी हरतात; मात्र संघर्षकडे पाठ फिरवित नाहीत. कष्टकऱ्यांची, श्रमिकांची ही संघर्षशीलता अण्णाभाऊंनी प्रत्ययकारकतेने साहित्यात चित्रित केली. अण्णाभाऊंची त्यांच्याकडे पाहण्याची दृष्टी सकारात्मक, संघर्षाचे मूल्य शिकविते. या माध्यमातून अण्णाभाऊ हे दलित-शोषित समाजाचे महापुरूष म्हणून झळाळून सामोरे उभे राहतात. त्यांच्यामध्ये सातत्ले संघर्षाचे बळ, विजयी होण्याची प्रेरणा पेरताहेत. अण्णाभाऊंचे गिरणी कामगार होणे ही परिवर्तनकारी घटना होती."

डॉ. शिर्के म्हणाले, "वास्तवाशी जवळीक साधणारे लेखन करणाऱ्या अण्णाभाऊंचा अनुभव हाच गुरू होता. अण्णाभाऊंच्या अनेक कथांमध्ये अद्भुत, वास्तव एकावेळी अवतरते." अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले.

डॉ. पाटील यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. शाहीर देवानंद माळी आणि सहकाऱ्यांनी ऑनलाईन सहभागी होत कवनांचे सादरीकरण केले.

दरम्यान, मुख्य प्रशासकीय इमारतीत अण्णाभाऊंच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण केला. वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

पुण्यनगरी

# परताव्याच्या संधी विद्यार्थ्यांनी अवगत कराव्यात : वशिष्ठ

## कमोडीटीज डेरीव्हेटिव्ह प्रोग्रामचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सोने, चांदीपासून कपाशीपर्यंत वस्तूंवर वायदे बाजार व्यापार हा कमोडीटीज मार्केटमध्ये चालतो. त्याचा लाभ गुंतवणूकदार व छोट्या व्यावसायिकांनीसुद्धा घेतला पाहिजे. कमोडीटीज मार्केटमधील विविध संकल्पना व त्याबाबतचे अद्ययावत ज्ञान वाणिज्य व व्यवस्थापन शिक्षकांनी प्राप्त करावे. परताव्याच्या संधी अवगत कराव्यात, असे आवाहन मल्टी कमोडीटीज एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडचे सहायक व्हाईस प्रेसिडेंट आशुतोष वशिष्ठ यांनी केले. या प्रशिक्षण अध्यक्षस्थानी वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभागप्रमुख व अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभाग व मल्टी कमोडीटीज एक्स्चेंज ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पाच दिवसीय 'कमोडीटीज डेरीव्हेटिव्ह प्रोग्राम' प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील व विद्यापीठातील शिक्षकांना प्रशिक्षण देऊन कमोडीटीज एक्स्चेंजबाबत ज्ञान व कौशल्ये विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कमोडीटीज मार्केटची पार्श्वभूमी, मार्केटमधील उपकरणे, व किंमत जोखीम व्यवस्थापन, पेमेंट आदी विविध विषयावर पाच सत्रांचे आयोजन करण्यात आले होते. आशुतोष वशिष्ठ व विनीत सिंग कालेर यांनी हे प्रशिक्षण महाविद्यालय व विद्यापीठातील शिक्षकांना यांना दिले. डॉ. गंधाली खारगे व प्रा. राम मधाळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले. तेजपाल मोहरेकर यांनी तांत्रिक बाजू सांभाळली.

पुढारी

# कमला कॉलेज, शिवाजी विद्यापीठ फूड टेक्नॉलॉजी विभागामध्ये सामंजस्य करार

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कमला कॉलेज बी. व्होक फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट विभाग व शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ फूड टेक्नॉलॉजी यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.

सामंजस्य करारामुळे क्षेत्रात दोन्ही विभाग निश्चितच प्रेरणादायी काम करतील त्यादृष्टीने सामंजस्य कराराला विशेष महत्त्व आहे, असे मत ताराराणी विद्यापीठ संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी व्यक्त केले. सामंजस्य करारासाठी कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांचे मार्गदर्शन लाभले. फूड टेक्नॉलॉजी विभागाचे समन्वयक डॉ. ए. के. साहू व कमला कॉलेज, बी. व्होक फूड प्रोसेसिंग अँड मॅनेजमेंट विभागाच्या समन्वयक प्रा. रेखा पंडित यांनी यासाठी सहभाग घेतला. भविष्यात या करारांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे प्राचार्या डॉ. तेजस्विनी मुडेकर यांनी सांगितले.

03 AUG 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णाभाऊंच्या साहित्यात घटनाप्रधानतेला प्राधान्य

## विधानसभा सदस्य लहू कानडे यांचे प्रतिपादन : शिवाजी विद्यापीठात ऑनलाईन व्याख्यान संपन्न

प्रतिनिधी
कोल्हापूर

अण्णाभाऊ साठे हे मराठीतले अव्वल दर्जाचे साहित्यिक होते. व्यक्तिप्रधानतेऐवजी घटनाप्रधान लेखनीला त्यांनी सदैव प्राधान्य दिले. अण्णा भाऊंनी आपल्या लेखनीत वंचित, शोषित, कष्टकरी लोकांना कथा, कादंबऱ्यांचे नायक केले, असे प्रतिपादन कवी, लेखक, महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य लहू कानडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे अध्यासनाच्यावतीने अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित आयोजित ऑनलाईन व्याख्यानामध्ये ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांची प्रमुख उपस्थित होती.



कोल्हापूर : ऑनलाईन व्याख्यानात मार्गदर्शन करताना महाराष्ट्र विधानसभेचे सदस्य लहू कानडे.

कानडे म्हणाले, कष्टकऱ्यांची, श्रमिकांची संघर्षशीलता अण्णा भाऊंनी अत्यंत प्रत्यय कारकतेने आपल्या साहित्यात चित्रित केली. कलात्मकतेच्या निकषांवर त्यांची साहित्यनिर्मिती दर्जेदार स्वरूपाची आहे. या माध्यमातून अण्णा भाऊ हे दलित-शोषित समाजाचे महापुरूष म्हणून झळाळून समोर उभे राहतात. त्यांच्यामध्ये सातत्याने संघर्षचे बळ आणि विजयी होण्याची प्रेरणा मिळते. कामगार चळवळीने त्यांच्यातल्या शाहिराला व्यासपीठ व ओळख प्राप्त करून दिली. आपल्या चौफेर प्रतिभेच्या बळावर त्यांनी संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीमध्ये प्राण फुंकून ती जिवंत राखण्याचे काम केले, हे त्यांचे मोलाचे योगदान आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, अण्णा भाऊ साठे यांच्या लेखनात अद्भुतता, अतिशयोक्ती, अतार्किकता आहे, पण तेवढेच नव्हे; तर जीवनातील विदारक वास्तवही प्रगट झाले आहे.

शाहीर देवानंद माळी यांनी अण्णा भाऊ यांच्या कवनाचे ऑनलाईन सादरीकरण केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी स्वागत केले. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. अण्णा भाऊ यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, विद्यार्थी विकास मंडळ संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अध्यासनाचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे आदी उपस्थित होते.

तरुण भारत

# पाटील महाविद्यालयातील कॉमर्स विभागाद्वारे आज वेब सेमिनार

**शाहूवाडी :** मलकापूर–पेरीड येथील रयत शिक्षण संस्थेचे प्रा. डॉ. एन. डी. पाटील महाविद्यालयातील कॉमर्स विभागाद्वारे मंगळवार ३ रोजी सकाळी अकरा वाजता Rural Distress and Indian Agriculture या विषयावर वेब सेमिनार आयोजित करण्यात आला आहे. सदर वेब सेमिनारमध्ये शिवाजी विद्यापिठातील अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. डी. एस तुळूले हे मार्गदर्शन करणार आहेत. या वेब सेमिनारचा अभ्यासक, संशोधक, प्राध्यापक व विद्यार्थी युवक–युवती यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील हेळकर यांनी केले आहे.

03 AUG 2021 Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Over 1L citizens got clean water from ponds, lakes & wells on SUK campus during floods

Abhijeet.Patil@timesgroup.com

**Kolhapur:** Ponds, lakes and wells developed by the Shivaji University in Kolhapur (SUK) over the past few years on its campus have provided much-needed drinking water to more than a lakh citizens of the city hit by the Panchaganga flood.

Most people in the had been facing a severe shortage of clean water as the flooding had submerged the water pumping stations operated by the Kolhapur Municipal Corporation. Due to the flood and rain-caused landslides, even the river water had turned muddy and unfit for consumption.

Kolhapur civic chief Kadambari Balkawade had then approached the administration of the Shivaji University for the supply of fresh and clean water for drinking.

Shivaji University



KMC staff with a water tanker being filled at SUK's treatment plant

Over the past few years, the SUK has been making efforts to conserve water on the campus. In fact, the university became self-sufficient in terms of drinking water a couple of years ago. The 800-acre campus has six ponds, three lakes and eight wells with a total storage capacity of 40 crore litre. Right now, the water requirement within the campus is low as there are no students there and classes are not taking place due to the Covid restrictions.

D T Shirke, the SUK vice-chancellor, said, "Anticipating the drinking water shortage during flood situations, we had ensured that all the ponds and lakes have adequate storage. We are now supplying around 10-12 lakh litre of drinking water every day to the citizens through water tankers. Over the past few years, our water conservation efforts have yielded satisfactory results."

The conservation works include water recycling, trenching, removal of sediments from wells, rejuvenation of lakes and creation of farm ponds. Over Rs 1.5 crore was spent on the works. The aim was to reduce dependency on river water and to do away with the annual water bill — around Rs 50 lakh. The university administration has also allowed cattle owners to get green grass to feed their cattle. The grass is grown on large tracts of land on the campus. Currently, most fields in Kolhapur are inundated and the standing crops are damaged. Therefore, there is a shortage of green fodder.